परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा–याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान. त्याबाबत सेवानिवृत्ति वेतन विषयक लाभाचे सन 2023–2024 (पुरवणी) आणि 2024–2025 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

(अर्थ व प्रशासन विभाग)

**परिपत्रक**

जावक क अप्रवि/पीईएन/डीसीपीएस/अंदाजपत्रक/2024–25/797/2023 दि.04/08/2023

**वाचा** :–1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. :रानियो–2022/प्र.क्र.34/सेवा–4, दि. 31 मार्च, 2023.
2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. :रानियो/प्र.क्र.34/सेवा–4, दिनांक 20 एप्रिल, 2023.
3) कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांचे परिपत्रक क.बीजीए/पेन्शन/07/2023/1235 दि.01 ऑगष्ट 2023.

उपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठातील सर्व विभाग, कार्यालये व महाविद्यालये तसेच विद्यापीठ संलग्न असलेले शासन मान्य अनुदानीत महाविद्यालये, कृषि शाळा, शिक्षण संस्था इ.सूचित करण्यात येते की, संदर्भांकित शासन निर्णय/शुध्दीपत्रक दि.31 मार्च 2023 च्या अनुषंगाने व मा.कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांनी निर्गमित केलेल्या दि.1 ऑगष्ट 2023 च्या परिपत्रकान्वये नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणा–या परंतु दिनांक 01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त होणा–या कर्मचा–यांना अनुक्रमे नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा–याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणा–या कर्मचा–यांना सेवा निवृत्ति उपदान तसेच दिनांक 01/11/2005 ते शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत मृत्यू पावलेल्या कर्मचा–यांच्या कुटुंबास मृत्यू उपदान, कुटुंबनिवृत्तिवेतनाची थकबाकी तसेच नियमित कुटुंबनिवृत्तिवेतन अनुज्ञेय केले आहे. त्यानुसार कुटुंब निवृत्तिवेतनधारकास त्याला मिळालेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम व परिभाषित निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाच्या अंशदानाची व्याज/लाभांशासह रक्कम समायोजित करण्याच्या अटीवर कुटुंबनिवृत्तिवेतनाचा लाभ अनुज्ञेय होईल. सदर रक्कम समायोजित झाल्यानंतर कुटुंब निवृत्तिवेतनधारकास नियमितपणे कुटुंबनिवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील

परंतु असे सेवानिवृत्तीविषयक लाभ प्रदान करण्याकरीता अंदाजपत्रकात तरतूद होणे आवश्यक आहे.याकरीता संबंधीत विभागाने सन 2023–24 चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात पुरवणी मागणीव्दारे आणि सन 2024–25 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात नियमित मागणीव्दारे निवृत्तीवेतन या लेखाशिर्षांतर्गत अनुदान प्राप्ती करीता या परिपत्रकासोबत सहपत्रित केलेले प्रपत्र क.5 ते 8 मधील वर्षनिहाय माहिती अर्थ व प्रशासन विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना दि. 11/08/2023 पुर्वी पोहचेल या बेताने न चुकता पाठवावी.

उपरोक्त प्रपत्राव्दारे प्राप्त माहिती संकलीत करुन शासनाकडे सेवानिवृत्ती व लेखाशिर्षांतर्गत अनुदानाची मागणी करावयाची असल्याने सदर माहिती प्राधान्याने देण्यात यावी. माहिती अप्राप्त असल्याकारणाने जर कोणत्याही सेवानिवृती वेतनधारकास निवृत्तीवेतन विषयक लाभ प्रदान न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत विभागाची राहील.

नियंत्रक
डॉ पंजाबराव देशमूख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपी:

1. नियंत्रण अधिकारी/ आहरण संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख (सर्व)
2. प्राचार्य ————————————————————
3. वेतन व लेखाधिकारी, अकोला / नागपूर यांना कार्यवाही करीता अग्रेषित.
4. कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त संदर्भानुसार विद्यापीठातील सन 2023–24 (पुरवणी) आणि 2024–25 या आर्थिक वर्षातील सेवानिवृत्त झालेले/होणा–या परिभाषित अंशदान नि.वे.योजना/रा.नि.प्रणाली अंतर्गत कर्मचारी सेवा कार्यरत असतांना मृत झालेले, रुग्णताधारक आणि सेवेतून निवृत्त होणा–या कर्मचा–यांची (नांव, पदनाम, अंतिम वेतन, निवृत्त दिनांक व विभाग) यांची माहिती आपल्या अधिनस्त असलेले निवृत्ती वेतन कक्षाकडुन पाठविण्यात यावी ही विनंती.
5. प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, संशोधन संचालनालय, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेले अंदाजपत्रकाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

### प्रपत्र–क 5

**सन 2023–2024 या आर्थिक वर्षाकरीता (पुरवणी मागणी)** उपरोक्त संदर्भास अनुसरुन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा–यांचा सेवा कालावधीत मृत्यू झालेले कर्मचारी/रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त झालेले कर्मचा–यांची माहिती (दि.01/11/2005 ते दि.31/03/2023)

| अ. क. | अधिकारी/कर्मचा–यांचे नांव व पदनाम | जन्म दिनांक | सेवेत रुजू झाल्याची दिनांक | सेवा कार्यरत असतांना मृत्यू झाल्याची दिनांक/रुग्णता सेवानिवृत्त दिनांक/शासन सेवेतून निवृत्त झाल्याची दिनांक | मृत्यू/रुग्णता सेवानिवृत्त /सेवानिवृत्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| एकुण अहर्ताकारी सेवा कालावधी वर्ष महीने/दिवस | मागील दहा महिन्याचे सरासरी अंतिम वेतन | अंतिम मुळ वेतन/निवृत्ती वेतन | मुळ अंतिम किंवा निवृत्ती वेतनावर अनुज्ञेय महागाई वाढ रक्कम | एकुण बेरीज 9+10 | एकुण 12 महिण्याची प्रस्तावित मागणी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का                                        आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 6

रजारोखीकरण तरतूदीची मागणी

**सन 2023–24 या आर्थिक वर्षाकरीता (पुरवणी मागणी)** (दि.01/11/2005 ते दि.31/03/2023)

| अ. क. | अधिकारी/कर्मचा–यांचे नांव व पदनाम | सेवा कार्यरत असतांना मृत्यू झालेले/रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त झाल्याची दिनांक | सेवा कालावधीत मृत्यू झालेल्या/रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त झाल्याच्या दिनांकास शिल्लक असलेली एकुण अर्जित रजा | अर्जित रजेच्या गणनेनुसार एकुण देय रजारोखीकरण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का                                        आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 7

**सन 2024–25 या आर्थिक वर्षाकरीता** उपरोक्त संदर्भास अनुसरुन रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त होतील असे अधिकारी/कर्मचा–यांची माहिती (दि.01/03/2024 ते दि. 28/02/2025)

| अ.क. | अधिकारी/कर्मचा–यांचे नांव व पदनाम | जन्म दिनांक | सेवेत रुजू झाल्याची दिनांक | रुग्णता सेवानिवृत्त दिनांक/शासन सेवेतून निवृत्त झाल्याची दिनांक | रुग्णता सेवानिवृत्त/सेवानिवृत्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 2 | 3 | 5 | 6 |
| | | | | | |

| एकुण अहर्ताकारी सेवा कालावधी वर्ष महीने/दिवस | मागील दहा महिन्याचे सरासरी अंतिम वेतन | अंतिम मुळ वेतन/निवृत्ती वेतन | मुळ अंतिम किंवा निवृत्ती वेतनावर अनुज्ञेय महागाई वाढ रक्कम | एकुण बेरीज 8+9 | एकुण 12 महिण्याची प्रस्तावित मागणी |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | |

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का                                        आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का

### प्रपत्र–क 8

रजारोखीकरण तरतूदीची मागणी

**सन 2024–25 या आर्थिक वर्षाकरीता** (दि.01/03/2024 ते दि. 28/02/2025)

| अ.क. | अधिकारी/कर्मचा–यांचे नांव व पदनाम | रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त होतील ती दिनांक | रुग्णता सेवानिवृत्त/शासन सेवेतून निवृत्त झाल्याच्या दिनांकास शिल्लक असलेली एकुण अर्जित रजा | अर्जित रजेच्या गणनेनुसार एकुण देय रजारोखीकरण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नोंदविलेली माहिती कर्मचा–यांच्या मुळसेवा पुस्तीकेमधील नोंदीच्या आधारे घेतलेली असून ती पडताळणी केली असून बरोबर आहे.

कार्यालय प्रमुखांची सही व शिक्का                                        आहरण व संवितरण अधिकारी सही व शिक्का